# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते
**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी
**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ५०.००
वार्षिक वर्गणी : रु. ५००.००



**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०-२४४७४२९५
ई-मेल : sci.vibha@gmail.com



या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.


# नववर्षाचे स्वागत

नववर्षाचा जानेवारी २०२४ चा सृष्टिज्ञानचे ९७ व्या वर्षात पदार्पण करणारा अंक सहर्ष सादर करीत आहोत.

या जानेवारीपासून काही मोठे बदल करण्याचा मानस होता. परंतु मोठे बदल करण्याची सध्या आवश्यकता नाही, असा सर्वसाधारण वाचकांचा प्रतिसाद बघून मोठे बदल न करता लहान लहान बदल, तेही सावकाश करण्याचा निर्णय झाला आहे.

मागील वर्षाचा आढावा घेतला तर, सर्वात महत्वाची बाब म्हणजे सृष्टिज्ञानच्या व्यवस्थापनात मोठा बदल झाला, तरी त्याचा धक्का न बसता सृष्टिज्ञानची वाटचाल सुरळीत व सहज राखण्यात चांगले यश आले. अपेक्षित सहाय्य 'विज्ञान भारती' संस्थेने वेळोवेळी व सुलभतेने उपलब्ध करून दिले. लेखकांनीही चांगले सहकार्य केले. अंकाच्या बाकी गोष्टींपैकी टाईपसेटींग, अंतर्बाह्य सजावट, मुद्रण, यांचेही सातत्य राखले गेले.

अंतरंगात करावयाच्या बदलात, मूलभूत संशोधनाला प्रमुख स्थान देण्याचा विचार होता. परंतु त्यामुळे वाचकांना सवय नाही अश्या खूप तांत्रिक व विशेष वैज्ञानिक लेखांना प्रसिध्दी द्यावी लागली असती. ही तांत्रिक भाषा सर्वसामान्यांना समजण्यास अवघड झाले असते व 'सर्वसामान्यांसाठी विज्ञान' ही सृष्टिज्ञानची ओळख पुसली गेली असती, त्यामुळे 'सोप्या भाषेतून विज्ञान' हाच ढांचा कायम ठेवण्याचे ठरविले आहे. याचे प्रतिबिंब नोव्हें., डिसेंबर२०२३ च्या दिवाळी अंकात स्पष्टपणे दिसते. या अंकाचे वाचकांनी केलेले स्वागत व प्रतिक्रिया फारच उत्साहवर्धक आहे. मागील वर्षाचा 'लोकमान्य टिळक विशेषांकाचा' उल्लेख या आढाव्यात घेणे गरजेचे आहे. या विशेषांकालाही वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

या नववर्षाचे स्वागत 'कौशल्य विकास' या विषयावरील विशेषांकाने करावयाचे असे ठरविले होते. परंतु हा विषय एका विशेषांकाने संपवावा असा नाही असे लक्षात आले व पुढील वर्षभर हा विषय चालू ठेवला जाईल. वैज्ञानिक संशोधन संस्थांची माहिती दरमहा करून द्यायची असाही विचार होता. त्यानुसार पुढील महिन्यात लोणावळा येथील 'मनशक्ती प्रयोग केंद्र' या संस्थेची माहिती देऊन प्रारंभ होणार


SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Mudran, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

आहे. नवीन शैक्षणिक धोरणात 'भारतीय संस्कृती व भारतीय परंपरा' यांना महत्व आहेच. म्हणून याचे प्रतिक असलेल्या या संस्थेचा परिचय प्रथम आहे. या महिन्याचा अंक काही नियमित सदरे, प्रकाशाच्या आनंदाच्या सणाचा उत्तरार्ध म्हणावा अशा– 'पहिला प्रकाश' व 'कौशल्य विकास' परिचय या विषयक लेखांचा समावेश असलेला आहे.

'कौशल्ये विकास' या विषयास अनन्यसाधारण महत्व आहे. कौशल्य विकास कशासाठी असा विचार करताना अलिकडच्या काळातील दोन मानदंड समोर येतात. सर्व सामान्यांची सर्वांगीण प्रगती व राष्ट्राची समृध्दीकडील घोडदौड या एकमेकांशी निगडित असलेल्या गोष्टी आहेत. सर्वसामान्य जनता व राष्ट्र दोघांचाही विकास हवा तर कुशल राज्यकर्ता हवा. हिंदवी स्वराज्याची स्थापना, विकास व अटकेपार झेंडा नेण्याचा पाया 'जाणता राजा'– अर्थातच छत्रपती शिवाजी महाराजांनी घातला. राजकारण, अर्थकारण, व्यवस्थापन, इत्यादि अनेक प्रकारची कौशल्ये यांचा संगम छत्रपतींमध्ये होता व एक राष्ट्र उभे राहिले. आजही भारताचा सर्वांगीण विकास होतांना दिसतो तो कुशल नेतृत्वामुळे. भारत हे आज जगाच्या नकाशावर केंद्रस्थान मिळवित आहे. हा 'कौशल्य विकासाचा' महिमा आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ मा. डॉ. अ. ल. देशमूख यांच्या सुंदर लेखाने या वर्षभर चालणाऱ्या विषयास प्रारंभ करीत आहोत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, जर खरोखरच यथार्थाने अंमलात आणले तर हे शतक भारताचे. अशी नोंद जागतिक इतिहासात करावी लागेल. या धोरणाचा सारांश देशमुख सरांच्या लेखात आहे. या धोरणाच्या महत्वाच्या निकषांचा पाठपुरावा पुढील वर्षभर केला जाईल.

या विषयात प्रत्यक्ष काम केलेल्या काही कामाची तोंडओळख या अंकात आहे. खेळांमधून कौशल्य विकास, तर गणिताचे अनन्यसाधारण महत्व याची तोंडओळख करून देणारे लेख महत्वाचे आहेत. तसेच भाषा कौशल्य, तरण कौशल्य यांचे उपाय, विद्यार्थी स्तरावर काय करायला हवे अदि लेख आहेत,

जागतिक स्तरावरील संशोधनात भारत मागे आहे असे असतांना एक आशेचा किरण दिसतो आहे.

### आशेचा किरण

सध्या भौतिक शास्त्र संशोधनात कृष्ण पदार्थ व कृष्ण ऊर्जा या अनाकलनीय विषयांना फार महत्व आहे. एका भारतीय संशोधकाच्या संशोधनानुसार या दोन्ही विषयांवर प्रकाश पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यांना ओळखण्यात यश आले आहे. या वर्षाचा नोबेल पुरस्कार अॅटो सेकंद पल्सेस निर्मिती करणाऱ्यांना देण्यात आला. अजून थोडा सूक्ष्म म्हणजे झेप्टो सेकंद पल्स तयार करता आल्यास वरील संशोधनाची सत्यता पडताळता येईल. त्यात लवकरच यश येईल अशी आशा आहे.

**– रमेश दाते**
sci.vibha@gmail.com

**निवेदन**

सृष्टिज्ञान च्या वर्गणी संदर्भात. गेली ५ वर्षे, सृष्टिज्ञान ची वार्षिक वर्गणी ४००/– आहे. मासिक निर्मितीतील सततच्या वाढत्या खर्चामुळे, सृष्टिज्ञान मासिकाची वार्षिक वर्गणी ५००/–रू. करण्यात येत आहे. द्विवार्षिक वर्गणी १०००/– रू. राहील.

पोस्टाने अंक वेळेत मिळत नसल्याचे निदर्शनास आल्याने, कूरियर चा पर्याय ठेवावा लागत आहे. ज्यांना कूरियरने अंक हवा आहे, त्यांचेसाठी दरवर्षी ३५०/–रू. ज्यादा आकारले जातील. कूरियर खर्चासह वार्षिक वर्गणी ८५०/– रू असेल.

नाईलाजाने घेत असलेल्या या निर्णयाला सर्व वर्गणीदारांनी सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

– संपादक, सृष्टिज्ञान मासिक.

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा मुद्रण, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८ येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२ येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते